ग्राम पंचायतीच्या निवडणूकीसाठी प्रभाग रचना

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग,
परिपत्रक क्रमांक-ग्रापनि-१०८८/२२३२/प्र.क्र. ९९८/२१-अ,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. दिनांक १६ जानेवारी १९८९.

जिल्हाधिकारी, नाशिक यांचे क्रमांक-कक्ष-२/ग्रापं./९४४/८८, दिनांक १३ ऑक्टोबर १९८८ चे पत्र कृपया वाचावे.

सन १९८४ मध्ये घेतलेल्या ग्राम पंचायतींच्या निवडणूकांसाठी सन १९८१ च्या जनगणनेच्या आकडेवारीनुसार प्रभाग रचना करण्यात आली. सन १९८९ मध्ये घेण्यात यावयाच्या ग्राम पंचायतींच्या निवडणूकांसाठी सुध्दा सन १९८१ च्या जनगणनेच्या आकडेवारीनुसार प्रभाग रचना करावयाची आहे. या परिस्थितीत सन १९८४ मध्ये घेतलेल्या ग्राम पंचायतींच्या निवडणूकांच्या वेळी केलेल्या प्रभाग रचनेत बदल होण्याची शक्यता नसल्यामुळे यापुढे घ्यावयाच्या ग्राम पंचायतींच्या निवडणूकांसाठी नव्याने प्रभाग रचना करणे आवश्यक आहे किंवा कसे या मुद्यावर मार्गदर्शन करण्याची विनंती शासनास करण्यात आली आहे.

परिपत्रक:- ग्राम पंचायतींची निवडणूक घेण्यापूर्वी, मुंबई ग्राम पंचायत [गावाचे प्रभागात विभाजन करणे आणि स्त्रिया व अनुसूचित जाती व जमाती यांच्यासाठी पदे राखून ठेवणे] नियम, १९६६ च्या नियम ५ च्या तरतूदीनुसार प्रभाग रचना व राखीव पदे याबाबतची सूचना, नियमाना जोडलेल्या नमुना "ब" मध्ये प्रसिध्द करून आक्षेप मागवावे लागतात. अशी सूचना संबंधित गावातील चावडी, सार्वजनिक ठिकाण वगैरे ठिकाणी लावावी लागते. इतकेच नव्हे तर अशा सूचनेची प्रसिध्दी संबंधित गावात ढोल वाजवून करावी लागते. ही प्रक्रिया पूर्ण न करता ग्राम पंचायतीची निवडणूक घेतल्यास ती नियमबाह्य ठरेल.

२. सन १९८४ च्या निवडणूकीच्या वेळी असलेली गावाची रचना सन १९८९ मध्ये बदलली असण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्यावेळी एका प्रभागात समाविष्ट असलेली सर्व घरे त्याच प्रभागात मोडतील याची शाश्वती नाही. तसेच सन १९८४ च्या निवडणूकीसाठी केलेल्या प्रभाग रचनेस त्यावेळी आक्षेप घ्यावयाची इच्छा असूनही आक्षेप घेऊ न शकलेल्या मतदारावर अन्याय केल्यासारखे होईल.

३. परिच्छेद १ व २ मध्ये केलेल्या विश्लेषणावरून ग्राम पंचायतीच्या प्रत्येक सार्वत्रिक निवडणूकीच्या वेळी नव्याने प्रभाग रचना करणे आवश्यक आहे हे स्पष्ट होईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ज. स. घाणेकर]
कक्ष अधिकारी, ग्राम विकास विभाग.

सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी [जिल्हाधिकारी, मुंबई व उपनगरे वगळून]
ग्राम विकास विभाग, कार्यासन २१ व २२
ग्राम विकास विभाग, कार्यासन २१-अ, निवड नस्ती.

जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी.
30 JAN 1989
शाखा - GB/VPC
जि. उ. जि. जिल्हाधिकारी